# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीरी/इंजि./मान्यता/२०१२/ ३५५३
दिनांक : 14 SEP 2012

प्रति,
प्राचार्य,
अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी,
मंगळवारी बाजार, सदर, नागपूर – ४४० ००१.

**( Institute Code 4172 )**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना-अनुदान तत्वावर अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय, क्रमांक- टिईएम -२०१२/प्र.क्र.९८(भाग-१)/तांशि-४ दि. ३० जून, २०१२.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता बदल |
|---|---|---|
| १. | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० – १२० |

सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेसाठी आयडीबीआय बॅंक लि., शाखा-सदर नागपूर येथे खाते क्र.२३३७९९१ दि.२४.०८.२०१२, अन्वये रु.१.५० लाख संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच १००/- च्या स्टॅम्प पेपरवर शर्ती व अटी मान्य असल्याबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तरी वरील अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतावाढीस व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून या संचालनालयाकडून खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१. सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेस कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांची संलग्नता घ्यावी लागेल.

२. प्रवेशक्षमता वाढीस दिलेली मंजूरी विना-अनुदान तत्वावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे आवर्ती व अनावर्ती अनुदान शासनाकडून मंजूर केले जाणार नाही.

३ विना-अनुदान पदवी अभ्यासक्रमाच्या बाबतीत वेळोवेळी राज्यशासन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच संचालनालयाकडून करण्यांत आलेल्या/येणा-या नियमांचे, प्रवेश नियमांचे, आरक्षण, शिक्षण शुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. वाढीव प्रवेशक्षमतेसाठी विद्यापीठ व राज्यशासन यांच्या मानके व प्रमाणके नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्त करण्यांत यावी व त्यांना नियमांप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात यावेत.

५. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

६. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

७. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे** शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

**(डॉ. सुभाष महाजन)**
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. **कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर** यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.

ANJUMAN COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY, SADAR, NAGPUR
(1) PRINCIPAL
(2) ADM OFFICER
(3) CLERK
(4) DATE : 24-09-2012
S. No. 32364.